# शिवाजी विद्यापीठात सोमवारी संवेदीकरण कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. १९ :** बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग व शिवाजी युनिव्हर्सिटी कॉलेज लायब्ररियन्स असोसिएशनतर्फे सोमवारी (ता. २२) 'यूजीसी (प्रमोशन ऑफ ॲकॅडेमिक इंटेग्रिटी ॲंड प्रिव्हेंशन ऑफ प्लॅगॅरिझम इन हायर एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्स) रेग्युलेशन्स २०१८' विषयावर संवेदीकरण कार्यशाळा होत आहे. ग्रंथालयातील व्हर्च्युअल क्लासरूममध्ये स. ११ वाजता त्याचे उद्‌घाटन होईल. संशोधन करत असताना वेगवेगळ्या प्रकारचे माहितीस्रोत वापरत असताना त्यांचा संदर्भ देणे, वापर करणे व वाङ्‌मयचौर्य रोखणे या बाबींची जागरूकता निर्माण होण्यासाठी आयोगाने ठरवून दिलेल्या विषयावर सर्वतोपरी नवसंशोधक, शिक्षक यांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने कार्यक्रम होणार आहे.

# ‘कोल्हापुरी’च्या मार्केटसाठी हटके स्टार्टअप

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT


निकिता भरणे


अस्मिता पाटील

## निकिता, अस्मिता यांनी बनवली वेबसाइट

**कोल्हापूर :** कोल्हापुरी चप्पल जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी सध्या अनेक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. कोल्हापुरी चप्पल क्लस्टर योजनेला गती आली आहे. शिवाजी विद्यापीठानेही क्लस्टर समूहाशी सामंजस्य करार करून या कारागिरीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी हात पुढे केला आहे. यामध्ये आता दोन तरूण मैत्रीणींनीही योगदान देत कोल्हापुरी चप्पलच्या ऑनलाइन मार्केटसाठी वेबसाइट तयार केली आहे. सायबरमध्ये शिकणाऱ्या निकिता भरणे आणि आयटीतून इंजिनीअर झालेल्या अस्मिता पाटील यांनी एका क्लिकवर कोल्हापुरी चप्पल जगभरातील मार्केटमध्ये खुली केली आहे.

निकिता सायबरमध्ये एमसीएच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे तर अस्मिताने केआयटी कॉलेजमधून नुकतीच आयटी या शाखेतून इंजिनीअरिंगची पदवी घेतली आहे. कोल्हापुरी चप्पल बनवणाऱ्या कारागिरांची पुढच्या पिढीने या व्यवसायात नवीन काहीतरी करावे यासाठी कोल्हापुरी चप्पल व आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालण्यासाठी विद्यापीठाच्या कौशल्य विकास विभागातर्फे पुढाकार घेतला आहे. चप्पलचे पारंपरिक महत्त्व, या कलेत आयुष्य वेचलेल्या चर्मकार कुटुंबांच्या पिढ्या यांना एक पाऊल पुढे घेऊन जाण्यासाठी कोल्हापुरी क्लस्टर समूहाच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे, या संकल्पनेवर गेल्या वर्षभरापासून काम सुरू होते. या दरम्यान कौशल्य व विकास विभागाच्यावतीने डॉ. ए. एम. गुरव यांनी कोल्हापुरी चप्पलसाठी केलेल्या सामंजस्य करारातून कोल्हापुरी चप्पलच्या मार्केटिंगवर लक्ष केंद्रीत केले. यासाठी त्यांनी काही तरूणांना आवाहन केले होते. निकिताचा याच आवाहनाच्या निमित्ताने डॉ. गुरव यांच्याशी संपर्क झाला. शुभम आणि प्रसाद या मित्रांसोबत विद्यापीठाच्या कौशल्य व विकास विभागात निकिताच्या डॉ. गुरव यांच्याशी झालेल्या चर्चेत कोल्हापुरी चप्पलबाबत वेबसाइट बनवण्याबाबत विचारणा करण्यात आली. एमसीए याच विषयात शिकत असल्यामुळे तिला ही संधी सोडायची नव्हती. अस्मिता या मैत्रिणीसोबत वेबसाइट करण्याबाबत चर्चा केली आणि त्यानंतर या दोघीही त्यासाठी तयार झाल्या.

कोल्हापुरी चप्पलबाबत सर्वेक्षण करताना दर्जा चांगला नसल्याने फसवणूक झाल्याची माहिती या दोघींना काही पर्यटकांकडून मिळाली. इतकेच नव्हे तर स्थानिकांनाही कोल्हापुरीबाबत फसवले जात असल्याचा अनुभव पुढे आला. निकिता सांगते, ‘फसवणुकीच्या अनुभवांमुळे वेबसाइटच्या माध्यमातून कोल्हापुरी चप्पल खरेदी करताना तिचे खरेपण कसे ओळखायचे याच्या टिप्स देण्यावर शिक्कामोर्तब झाले. तसेच कोल्हापुरी चप्पल कशी बनवली जाते, ही चप्पल बनवताना कारागिर किती टप्प्यात काम करतात, त्यावरचे कौशल्याचे काम कसे केले जाते याची माहिती देणारी क्लीपही या वेबसाइटवर ग्राहकांना पहायला मिळणार आहे.’

> **कोल्हापुरी चप्पल जर ऑनलाइन मार्केटमध्ये सोशल मीडियाद्वारे पोहोचली तर त्याचा फायदा येथील कारागिरांना होणार आहे. या चप्पलच्या डिझाइनमध्ये जे नाविन्य आले आहे त्यासाठी नव्या पिढीचा ग्राहक तयार होणे आवश्यक आहे. निकिता व अस्मिता या तरूणींनी कोल्हापुरी चप्पलच्या ऑनलाइन मार्केटिंगसह चप्पल तयार होण्याचा प्रवासही या वेबसाइटच्या माध्यमातून पोहोचवला आहे.**
>
> – **डॉ. ए. एम. गुरव**, समन्वयक, कौशल्य व विकास, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठात सोमवारी कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग व सुक्ला (शिवाजी युनिव्हर्सिटी कॉलेज लायब्ररीयन्स असोसिएशन) यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै रोजी यूजीसी (प्रमोशन ऑफ ॲकॅडमीक इन्टेग्रीटी अँड प्रेव्हेंशन ऑफ प्लॅगारिझम इन हायर एज्युकेशनल इन्स्टिटट्युशन्स रेग्युलेशन्स या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्‌घाटन कुलगुरू, डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू, डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. डॉ. एस. के. सावनुर मुंबई, डॉ. एस. वाय. बनसोडे पुणे विद्यापीठ, डॉ. आर. के. कामत, संगणकशास्त्र अधिविभाग व उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार हे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचा ५६ वा वर्धापन दिन व १९८९-९० वर्षातील एम.लिब.च्या दुसऱ्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन ज्ञानस्त्रोत केंद्र तथा कार्यशाळा संयोजक डॉ. नमिता खोत, डॉ. शालिनी आर. लिहितकर यांनी केले आहे.

# विद्यापीठात आज पारितोषिक वितरण समारंभ

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार (दि. २०) रोजी दुपारी १२ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.